नियमीत फौ. ख. क्र. ३१/२०१७
सरकार -वि.- देविदास
नि.क्र. ६१.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - अरुन परसराम सवाईमून,
वय ६२ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त वन मजुर,
राहणार – तिरखुरा ता. उमरेड, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. दि.०३.०४.२०१६ रोजी मी खेडी आघार येथे वन मजुर म्हणून काम करत होतो. त्यादिवशी वरिष्ठ अधिकाऱ्यांचा मला फोन आला की, क्षेत्र क्र.३७९ मध्ये शिकार झाली आहे. तेव्हा मी सकाळी ३.०० वाजताच्या सुमारास मोक्का पंचनाम्याकामी पांजरेपार पांधर रस्त्यावर गेलो. तेथे आम्ही बाजुला थांबून होतो. त्यावेळी माझ्यासोबत मौदेकर हे वन मजुर, निमशेटी वन संरक्षक, खोडनकर साहेब आर.एफ.ओ. हे होते. त्यावेळी मोटार सायकलचा आवाज आला. तेव्हा आम्ही पाहिले असता दोन मोटार सायकल होत्या. त्यांना आम्ही पकडले. त्यांच्याकडे एका लाल बोरी होती तिची पाहणी केली असता त्यामध्ये एक हरीण व एक ससा मिळून आली. हरीणीचे मुंडके कापलेले होते, ससा हा मेलेला होता. त्यानंतर त्यांच्याकडे असलेल्या दुसऱ्या बोरीमध्ये हत्यार सापडले. त्यानंतर खोडणकर साहेबांनी पंचनामा केला. त्यावेळी तिसरी मोटार सायकलवर बसलेले व्यक्ती मागूनच पळून गेले. त्यानंतर खोडणकर साहेबांनी माझा बयान घेतला, पंचनामा तयार केला मला वाचून दाखविला व माझी सही घेतली. आता मला दाखविलेला नि.क्र.५८ वरील पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर दुसरी सही दिलीप मौदेकर यांची आहे. त्यानंतर मृत वन्य प्राण्यांचा मरणोत्तर पंचनामा केला. आता मला दाखविलेला नि.क्र.५९ वरील पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर दुसरी सही दिलीप मौदेकर यांची आहे. त्यानंतर जप्त हत्यारांचा पंचनामा केला. आता मला दाखविलेला नि.क्र.६० वरील पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर दुसरी सही दिलीप मौदेकर यांची आहे. त्यानंतर मृत

प्राण्यांची नियमानुसार विल्हेवाट लावण्यात आली व तसा पंचनामा तयार करण्यात आला. आता मला दाखविलेला पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६२** देण्यात येते. त्यानंतर आरोपींना अटक करुन तसा अटक पंचनामा तयार करण्यात आला. आता मला दाखविलेला अटक पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६३** देण्यात येते. ज्या व्यक्तींना माझ्या समक्ष पकडण्यात आले होते ते आज कोर्टात हजर आहे. त्यांना मी ओळखतो. ज्या वस्तू माझ्या समक्ष जप्त करण्यात आल्या होत्या त्या मला दाखविल्यास मी ओळखू शकतो.

२. आता मला जप्त केलेले आर्टिकल 'ए' ते 'ई' वरील पाच सुरे दाखविण्यात आले. ते तेच आहे. आता मला आर्टिकल 'एफ' ते 'आय' वरील चार लोखंडी सत्तु दाखविण्यात आले. ते तेच आहेत. आता मला आर्टिकल 'जे' ते 'एम' वरील चार लोखंडी काणस दाखविण्यात आले ते तेच आहेत. आता मला आर्टिकल 'एन' वरील एक पेचकस दाखविण्यात आला. ते तेच आहे. आता मला आर्टिकल 'ओ' वरील जप्त केलेले तारचा गुच्छा दाखविण्यात आला. तो तोच आहे. आता मला आर्टिकल 'पी' व 'क्यु' वरील जप्त केलेल्या दोन कुऱ्हाडी दाखविण्यात आल्या. त्या त्याच आहे. आता मला आर्टिकल 'आर' ते 'एस' वरील जप्त केलेल्या दोन प्लॅस्टीकचे बॉटल दाखविण्यात आले त्यामध्ये लोखंडी छर्रे आहेत. त्या त्याच आहेत. आता मला आर्टिकल 'टी' ते 'यु' वरील प्लॅस्टीकच्या दोन बॉटल दाखविण्यात आल्या त्यामध्ये बारुद पावडर आहे. ते माझ्या समक्ष जप्त केले होते. आता मला आर्टिकल 'व्ही' वरील प्लॅस्टीकची एक छोटी बॉटल दाखविण्यात आली त्यामध्ये कापूस आहे. आता मला आर्टिकल 'डब्ल्यू' वरील जप्त केलेली टॉर्च दाखविण्यात आली. ती तीच आहे. आता मला आर्टिकल 'एक्स' वरील जप्त केलेली एक लहाण प्लॅस्टीकची बॉटल दाखविण्यात आली. त्यामध्ये एक बॅटरीचा लाईट आहे. आता मला आर्टिकल 'वाय' वरील जप्त केलेली एक प्लॅस्टीकची पाण्याची बॉटल दाखविण्यात आली. ती तीच आहे. आता मला आर्टिकल 'झेड' वरील जप्त केलेला एक रबरी ट्युबचा तुकडा दाखविण्यात आला. आता मला आर्टिकल 'एए' वरील जप्त केलेली लोखंडी मोठी काणस दाखविण्यात आली ती तीच आहे. आता मला आर्टिकल 'एबी' ते 'एडी' वरील जप्त केलेल्या मोटार सायकलच्या फोटो दाखविण्यात आले. त्या त्याच जप्त केलेल्या मोटार

सायकलचे फोटो आहेत. आता मला आर्टिकल 'एई' वरील जप्त केलेली पांढऱ्या रंगाची प्लॅस्टीकची गोणी दाखविण्यात आली. ती तीच आहे.

सरतपास संपला.

**<u>उलट तपास आरोपींतर्फे त्यांचे वकील श्री खाणोरकर यांचे मार्फत -</u>**

३. मी वन मजुर म्हणून काम करीत होतो मी आता सेवानिवृत्त झालो आहे. माझी ड्युटी घटनेच्या काळात उमरेड येथील खेडी आघार येथे होती. माझे राहणे तिरखोरा येथे होते. तिरखोरा हे गाव अंबोरा रस्त्यावर आहे. ते मुख्य रस्त्यावर नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या गावावरुन उमरेड येथे येण्या जाण्याकरिता मार्ग नाही. माझी स्वतःची गाडी नाही. माझी ड्युटी २४ तास असायची. मला २४ तासाचा पगार मिळत नाही. तिरखोरा वरुन पांजरेपार ५० कि.मी. अंतरावर आहे. माझ्या स्वतःच्या गाडीने गेल्यास तिरखोरावरुन पांजरेपारला जाण्याकरिता २ तास लागतात. मला पांजरेपारला जाण्याकरिता माझ्या गावावरुन उमरेडवरुन जावे लागते. मी रात्री ३.३० वा. पांजरेपार येथे पोहचलो. आम्ही त्यावेळी दोन गाड्या पकडल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी जाण्याआधी गाड्या पकडल्या गेल्या होत्या. मला त्या गाड्यांचा नंबर सांगता येईल. त्या गाड्यापैकी एक गाडी होंडा कंपनीची होती व एक डिलेक्स होती. सर्व कागदपत्र व पंचनामे घटनास्थळावर तयार केले होते. सत्तू व कुऱ्हाडला रक्त लागले होते. जे हरीण मिळून आले होते ते गोळी लागून मरण पावलेले होते. जे शस्त्र जप्त करण्यात आले होते त्यामध्ये बंदूक जप्त करण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींकडून बंदूक जप्त करण्यात आली नाही. मांस हे प्लॉस्टीकच्या बोरीमध्ये मिळून आले होते. मिळून आलेल्या हरणाची मान व पाय तोडलेले होते. बोरीला रक्त लागले होते. मांसाला माती व गवत लागलेले नव्हते व बोरीलाही माती व गवत लागलेले नव्हते. हे मला सांगता येणार नाही की, मास व शस्त्र हे कोणत्या गाडीवर पकडण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, जप्त केलेले शस्त्र हे गावातील शेतकऱ्यांकडे मिळून येते. माझ्या समक्ष आरोपींची विचारपूस करण्यात आली होती. त्यांना बंदूकी संदर्भात विचारपूस करण्यात आली नव्हती. कागदपत्र हे ३.३० ते ५.०० वाजताच्या दरम्यान करण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, सर्व कागदपत्र पांजरेपार येथे तयार करण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्यावेळी उमरेड येथील सर्व अधिकारी उपस्थित होते. पंचनाम्यावर माझ्या व पंच

साक्षीदाराच्या व्यतिरिक्त रंगरी वन रक्षक यांचे सह्या आहेत. जप्त केलेल्या शस्त्रांना लेबल लावले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, जप्त केलेले मांस व शस्त्र मी केवळ पांजरेपार येथे पाहिले होते. घटनेच्यावेळी आरोपींपैकी केवळ तीन व्यक्ती हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी वन अधिकारी यांच्या सांगण्यावरुन पंचनाम्यावर सह्या केल्या. जप्त केलेल्या मोटार सायकल या दोन्ही काळ्या रंगाच्या होत्या व त्यावर लाल रंगाचे पट्टे होते. दुसरा पंच दिलीप यांनी जप्त केलेल्या गाड्या पाहिल्या होत्या व त्यांनी आरोपीला पाहिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेबाबत काही माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक ११.०३.२०२५.

स्वा/-
(एस.जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.